# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कु. वर्षा विद्याधर देसाई** यांनी शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली **स्त्रीवादी दृष्टिकोणातून 'नग्न प्रश्न' व 'रीटा वेलिणकर' या कादंबऱ्यांचा अभ्यास** ही प्रबंधिका माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केली आहे.

कु. वर्षा विद्याधर देसाई यांनी ही प्रबंधिका स्वतंत्ररित्या लिहिली असून, तो इतर कोणत्याही विद्यापीठातील अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरची प्रबंधिका शिवाजी विद्यापीटाच्या एम. फिल (मराठी) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक :२९ /०६/२००७

मार्गदर्शक

**डॉ. प्रकाश कुंभार**

# प्रतिज्ञापत्र

**स्त्रीवादी दृष्टिकोणातून 'नग्न प्रश्न' व 'रीटा वेलिणकर' या कादंबऱ्यांचा अभ्यास** या विषयावरील प्रस्तुतची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवीसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही व कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : /०६ /२००७

अभ्यासिका

**कु. वर्षा विद्याधर देसाई**

# ❁ अर्पणपत्रिका ❁

''ज्यांच्या कृपाछत्राने आज ही प्रबंधिका

पूर्ण होत आहे,

ज्यांची प्रेरणा माझ्या पाठीशी सदैव असते

ते माझे आई–बाबा व भाई यांच्या चरणी....''

*****

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठीची **'स्त्रीवादी दृष्टिकोणातून 'नग्न प्रश्न' व 'रीटा वेलिणकर' या कादंबऱ्यांचा अभ्यास'** ही प्रबंधिका पूर्ण होत असताना मला अत्यानंद होत आहे. या प्रबंधिकेचे लेखन करीत असतान्ा मला अनेकांची अनेकपरीने मदत झाली आहे.

माझे गुरु डॉ. प्रकाश कुंभार हे मला माझ्या प्रबंधिकेसाठी मार्गदर्शक म्हणून लाभले. त्यांचा मला स्वतंत्रपणे उल्लेख केला पाहिजे. त्यांचे मार्गदर्शन मला खूप मोलाचे ठरले. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे मी आत्मविश्वासाने ही प्रबंधिका वेळेत पूर्ण करु शकले. त्यांच्याशी वेळोवेळी केलेली चर्चा व त्यांनी केलेल्या सूचना प्रबंधिकेसाठी महत्वपूर्ण ठरल्या. प्रबंधिकेच्या संदर्भात त्यांनी केलेले हे मार्गदर्शन व त्यांचा स्नेह याची मी सदैव ऋणी राहीन.

विद्यापीठातील मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. कृष्णा किरवले तसेच डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रविंद्र ठाकुर, डॉ. रणधीर शिंदे व प्रा. हिमांशू स्मार्त यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर मराठी विभागाच्या कार्यालयातील लिपिक विनय पाटील तसेच श्री. सतीश कुसुंबे (मामा) यांचीही वेळोवेळी अनेक संदर्भात मदत झाली.

माझे आई-बाबा व भाई यांच्या प्रेरणेबरोबरच माझी आत्या सौ. सविता परब व काका श्री. कृष्णा परब यांची वेळोवेळी झालेली मदत माझ्या प्रबंधिकेस खूपच महत्वाची ठरली. तसेच प्रा. गोविंद काजरेकर सर व प्रा. शरयू आसोलकर (मॅडम)

यांच्याशी प्रबंधिकेसंदर्भात केलेली चर्चा व त्यांनी केलेले मार्गदर्शनही माझ्या प्रबंधिकेसाठी मोलाचे ठरले.

याबरोबरच संदीप जकाते-यादव, सचिन रुपनर, गजानन आपिने, सुप्रिया आवारे यांची या संदर्भात झालेली मदत व मार्गदर्शन माझ्या सदैव स्मरणात राहील.

**'श्री अत्री झेरॉक्स अँड कॉम्प्युटर्स कोल्हापूर'** यांनी थोडक्या वेळात अतिशय तत्परतेने व चोखपणे टंकलेखन केले त्यांची आस्था व आपुलकी यांचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

या सर्वांची मी मनापासून आभारी आहे.

**कु. वर्षा विद्याधर देसाई**